शिक्षण मंडळ कार्यालय
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/१९३/१०
दिनांकः- १७ /०३/२०१०

प्रति,

**मुख्याध्यापक,**
श्रमजीवी प्राथमिक विद्यालय,
संत तुकारामनगर, भोसरी, पुणे-३९

**विषयः- अतिरिक्त तुकडीसह अतिरिक्त कर्मचाऱ्याचे समावेशन करणेबाबत..**

संदर्भः- १) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचेकडील पत्र क्र. अमाशा/३०९५/क, दिनांकः- ०१/१२/१९९७.
२) प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ यांची दिः-१७/०३/२०१० ची मंजूर टिप्पणी.

**आदेश,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ व शासन निर्णयानुसार अतिरिक्त शिक्षक कर्मचाऱ्यांचे त्वरीत समावेशन करण्यात यावे.

| क्रं. | कर्मचाऱ्यांचे नांव व पदनांम | सध्या कार्यरत असलेल्या शाळेचे नांव व पत्ता | समावेशन करण्यात आलेल्या शाळेचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीमती वाडेकर सुजाता ज्ञानेश्वर, उपशिक्षिका. | विद्या विकास प्रशाला (प्राथमिक विभाग), कासारवाडी, पुणे-३४. | श्रमजीवी प्राथमिक विद्यालय, भोसरी, पुणे-३९. |

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात दिः- ३०/०९/२००९ च्या आपल्या शाळेतील विद्यार्थी पटसंख्या विचारात घेऊन वरील रकाना क्रंः- ३ मधील विद्या विकास (प्राथ.) प्रशाला, कासारवाडी, पुणे-३४ या शाळेतील इ. २ री ची अतिरिक्त २ री तुकडी कमी करुन श्रीमती वाडेकर सुजाता ज्ञानेश्वर, उपशिक्षिका यांचे समावेशन करुन घेण्याच्या अटीवर आपल्या शाळेच्या इ. १ ली च्या अतिरिक्त ३ ऱ्या तुकडीस अनुदान तत्त्वावर समायोजनाने मंजूरी देत आहे.

सबब, मी प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ असा आदेश देतो की. उपरोक्तप्रमाणे आपल्या शाळेत त्वरीत समावेशन करुन घेऊन पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा व त्याने सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात शिक्षक निश्चिती करुन घेण्यात यावी. तसेच श्रीमती वाडेकर यांना, मुख्याध्यापिका, विद्या-विकास (प्राथ.) प्रशाला, कासारवाडी, पुणे-३४ यांनी दिः-२२/०२/२०१० रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त केलेले असल्याने त्या दिनांकापासून त्यांचे वेतन अदा करण्यात यावे.

श्रमजीवी प्राथमिक विद्यालय
भोसरी पुणे ४११०३९
आवक क्र ९१ दि १८/३/२०१०

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी. पुणे-१८

प्रतः- १) मुख्याध्यापिका, विद्या विकास प्रशाला (प्राथमिक विभाग), कासारवाडी, पुणे-३४.
२) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, प्राथमिक शिक्षण संचलनालय, पुणे-०१.
३) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.
४) मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे-०१.
५) अधिक्षक, वेतन पथक विभाग (जिल्हा परिषद) पुणे-०१.
६) संबंधित शिक्षक, श्रीमती वाडेकर सुजाता ज्ञानेश्वर, उ. शि. विद्याविकास प्रशाला, कासारवाडी, पुणे-३४
२/- वरीलप्रमाणे आपल्या नांवासमोर दर्शविलेल्या समावेशीत शाळेत तात्काळ रुजू व्हावे.

२४८८/८०
जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुवि
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :

- 7 OCT 2003

प्रति,

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
पिंपरी-चिंचवड.

विषय : खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/प्राथमिक शाळांना सन २००१-०२ यावर्षी इ. १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वर्ग वाढीचे/अतिरिक्त तुकड्या मंजूर करणेबाबत. . .

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन परिपत्रक क्र. व्हीएलएस-१००३/(८५६/०३)/प्राशि-३, दिनांक ६ सप्टेंबर, २००३

सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षात उपरोक्त विषयाबाबतचे प्राप्त झालेल्या प्रस्तावास उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळांना नैसर्गिक/अतिरिक्त वाढीच्या वर्गांना विनाअनुदान तत्वावर मंजूरी मिळालेली आहे, त्यानुसार सदर शाळेस खालील अटींच्या अधिन राहून वर्गांना मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रमजीवी प्रा. विद्यालय, संत तुकाराम नगर, भोसरी, पुणे-३९ | मराठी | मनपा | ४ थी | दुसरी | जून २००१ |
| | | | | ५ वी | दुसरी | जून २००२ |
| | | | | ६ वी | दुसरी | जून २००३ |

१. नैसर्गिक/अतिरिक्त वर्गाचे वाटप करतांना शासन निर्णय दिनांक २.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यात यावी.

२. मंजूर करावयाच्या नैसर्गिक/अतिरिक्त वर्गाची गरज आहे. याची खातरजमा करुन त्यानंतरच वर्ग/तुकड्या मंजूर करण्यांत याव्यात.

३. ज्या शाळांना विनाअनुदान तत्वावर (कालांतराने अनुदान तत्वावर येणाऱ्या) परवानगी देण्यात आलेली आहे अशा शाळांना मंजूर करण्यांत येणाऱ्या नैसर्गिक/अतिरिक्त वाढीचे वर्गांना शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-१०००/(२४५५) प्राशि-१, दिनाक ८.११.२००० मध्ये नमूद केलेले अनुदान सुत्र लागू होईल.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१

सही असे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मुख्याध्यापक,
श्रमजीवी प्रा. विद्यालय, संत तुकाराम नगर, भोसरी, पुणे-३९.

२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

जाक्र.प्रा./प्राशि-३/खाप्राशा/पुवि/०८ 3800-02
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 21 FEB 2008

प्रति

शिक्षण प्रमुख,
मनपा. शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड,
जि. प. पुणे

**विषय :** खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/प्राथमिक शाळांना सन २००१-०२, २००२-०३, २००३-०४, २००४-०५, २००५-०६ व सन २००६-०७ या वर्षी इयत्ता ५ वी प्रथम व इ.१ ली ते ७ वी च्या नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त तुकड्या मंजूर करणेबाबत.

**संदर्भ :** १. मा. शालेय शिक्षण विभागाकडील शासन परिपत्रक क्र. प्राशैतु-१४०७(४१९/०७)/प्राशि-३, दि. ५ जानेवारी, २००८
२) मा. प्राथमिक शि. अ. [illegible] दि. १२.२.०८ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळाना नैसर्गिक वाढीच्या वर्गांना तसेच अतिरिक्त वाढीच्या वर्गांना **विनाअनुदान तत्वावर** मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार सदर शाळेस खालील अटींच्या अधीन राहून वर्गांना मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | तुकडी | मंजूरी वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रमजीवी प्राथमिक शाळा, भोसरी, पुणे | मराठी | मनपा. | ७ वी | दुसरी | जून २००४ |

१. नैसर्गिक वाढीचे वर्ग/तुकडयांना शासन निर्णय दि.२.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्यात यावी.

२. मंजूर करावयाच्या नैर्सागिक वाढीचे वर्ग/तुकड्यांची गरज आहे, याची खातरजमा करुन त्यानंतरच वर्ग/तुकड्या मंजूर करण्यात याव्यात.

३. सदर शाळांतील प्रथम वर्गास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्या वर्गास शासन निर्णय क्रमांक व्हीलएलएस-१०००/(२४५५)/प्राशि-१, दि. ८.११.२००० मध्ये नमूद केलेले अनुदान सूत्र किंवा प्रत्यक्षात अनुदान मंजूर करते वेळी जे अनुदान सूत्र अस्तित्वात असेल ते लागू होईल.

सदर शाळांना वर्ग मंजूरी आदेश आपण आपले स्तरावरुन तात्काळ निर्गमित करण्यात यावेत

स्थळप्रतिवर शि. उ. सं
यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहितीस्तव सादर
१) मुख्याध्यापक, श्रमजीवी प्राथमिक शाळा, भोसरी, पुणे
२) मा. शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचेकडे माहितीस्तव सादर.

विनाअनुदान तत्वावर
~~कायम विनाअनुदान तत्वावर~~

२६४८७/८८

जा.क्र प्राशि/खाप्राशा/वर्ग-तुकडी/मंजूरी/पुवि/०१
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 13 DEC 2001

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
जुनी तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.
३. प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/[illegible] शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड, पुणे-१८.

**विषय** : मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/[illegible] खाजगी प्राथमिक शाळेस सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षी नैसर्गिक/अतिरिक्त वाढीचा/वाढीच्या प्रथम/अतिरिक्त वर्ग/तुकड्या मंजूर करणेबाबत.

**संदर्भ** : प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्र.खाप्राशा/२०००/तुमा-१/६०७३२/इ-५१२, दिनांक २९.११.२००१

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक/अतिरिक्त वाढीचा/वाढीच्या प्रथम/अतिरिक्त वर्ग/तुकडया ~~अनुदान~~/विनाअनुदान/~~कायम विनाअनुदान~~ तत्वावर जून, २००० पासून सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यांत येत ~~आहे~~ आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ. नैसर्गिक/अतिरिक्त |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | |
| १. | श्रमजीवी, प्राथमिक विद्यालय संत तुकाराम नगर, भोसरी, पुणे. | मराठी. | इ. १ली, २री, ३री वी दुसरी तुकडी व इ. ५वी, ६वी. | अतिरिक्त. |
| | | | ७ वी या प्रथम वर्ग. | नैसर्गिक वाढ. |

**अटी व शर्ती.**

१. ज्या शाळांना जून, २००० पासून विनाअनुदान तत्वावर वर्ग/तुकडया मंजूरी देण्यात आलेली आहे या वर्ग/तुकडया भविष्यात जून, २००४ पासून अनुदानास पात्र ठरविताना शासन निर्णय क्रमांक-व्हीएलएस-२०००/(२४५५)/प्राशि-१, दिनांक ८.११.२००० मधील अटी व निकषांचा अवलंब करावा व अनुदानास पात्र ठरणा-या या वर्गाला/तुकडयांना आवश्यक असणारी आर्थिक तरतूदीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे त्यावर्षी उपलब्ध करुन घेण्याची दक्षता संबधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद/शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ यांनी घ्यावी.
२. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
३. सदर शाळेने वर्ग/तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन घ्याव्यात.
४. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सुविधा चांगली असणे आवश्यक आहे.
५. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या वर्ग/तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील पट व उपस्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
७. सदर शाळेच्या मंजूर करण्यांत आलेल्या या वर्ग/तुकडीत विद्यार्थी संख्या कायम पुरेशी असणे आवश्यक आहे.
८. तपासणी अंती एक जरी अट अथवा शर्त नियमबाह्य निदर्शनास आल्यास वर्ग/तुकडी मंजूरी रद्द करण्यात येईल.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
२. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका श्रमजीवी प्राथमिक विद्यालय, संत तुकाराम नगर, भोसरी, पुणे.